मालमत्ता कर आकारणी व नमुना नं. ८ नोंदीबाबत प्राप्त तक्रारींचे निवारण होण्याकरीता संनियत्रण समितीने आढावा घेणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांकः व्हीपीएम-२०१८/प्र.क्र.१/पंरा-४**

बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,

फोर्ट, मुंबई -४०० ००१

दिनांक : ०८ ऑगस्ट, २०१८

वाचा -शासन अधिसूचना क्रमांक : व्हीपीएम-२०१५/प्र.क्र.१४०/पंरा-४ दिनांक ३१ डिसेंबर, २०१५.

**शासन परिपत्रक -**

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम १२४ व त्याअंतर्गत महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी (शुल्क) नियम, १९६० यांमधील तरतुदींनुसार गावाच्या सीमेतील इमारती (मग त्या कृषी आकारणीस अधीन असोत किंवा नसोत) व जमिनी (ज्या कृषी आकारणीस अधीन नाहीत) यावर ग्रामपंचायतीस कर बसविण्याचा अधिकार आहे. महाराष्ट्र ग्रामपंचयात कर व फी नियम, १९६० मध्ये वाचा येथील शासन अधिसूचना दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ अन्वये सुधारणा करण्यात येऊन भांडवली मूल्यावर आधारित मालमत्ता कर आकारणी करण्यात येते. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमामधील कलम १२४ (५) व महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० मध्ये मालमत्ता कर आकारणी विषयक अपीलाच्या तरतूदी आहेत. तथापि, चुकीची कर आकारणी किंवा नमुना नं. ८ ला चुकीच्या नोंदी झाल्याने बाधित संबंधितांकडून मोठ्या प्रमाणावर तक्रारी होतात. तसेच काही प्रकरणांमध्ये न्यायालयीन बाबी उद्भवतात. ही वस्तुस्थिती विचारात घेता खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

परिपत्रक वेबसाईटवर टाकावे. प्र. विभाग 3/8/18

Scanned by CamScanner

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० मधील नियम ९(४) मधील तरतुदीनुसार कर आकारणी समितीच्या कामकाजावर संनियंत्रण ठेवण्यासाठी, कर आकारणीमध्ये येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी कर आकारणी समितीस सहाय्य करण्यासाठी संनियंत्रण समिती गठित करण्यात आलेली आहे. कर आकारणी, नमुना ८ नोंदी बाबत प्राप्त तक्रारींचे निवारण होण्याकरीता पंचायत समितीस्तरावरील संनियंत्रण समितीने प्रत्येक तीन महिन्याला किमान एक बैठक घेण्यात यावी. सदर बैठकीस तक्रारदारांना आमंत्रित करून सदर प्रकरणी नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदरचे शासन परिपत्रक त्यांच्या अधिनस्त सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी व ग्रामपंचायती यांच्या निदर्शनास आणण्यात यावे व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

सदरचे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१८०८०८११५५१८३४२० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay Raghunath Bankar

Digitally signed by Sanjay Raghunath Bankar
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Rural Devlopment And Water Conservation, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c8a7d6860ff227fd9e69a02e9ca5dfb2ccb25eda92d749629970f349fc6ed260, cn=Sanjay Raghunath Bankar
Date: 2018.08.08 12:56:40 +05'30'

**संजय बनकर**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई.
२. मा. विरोधी पक्षनेता, विधान सभा, विधानमंडळ, मुंबई.
३. मा. विधानसभा/मा. विधान परिषद सदस्य (सर्व)
४. मा. राज्यपाल यांचे सचिव
५. मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव
६. मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव



Scanned by CamScanner

७. मा. राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
८. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
९. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई.
१०.विधी मंडळ ग्रंथालय, विधान भवन, मुंबई (१० प्रती).
११.माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
१२.सर्व विभागीय आयुक्त.
१३. सर्व जिल्हाधिकारी.
१४.सर्व सह सचिव/ उप सचिव/ अवर सचिव/ कर्यासन अधिकारी ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. सर्व उपायुक्त (विकास/आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालये.
१६.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
१७. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता).
१८. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा व अनुज्ञेयता).
१९.महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१ मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर.
२०.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
२१. सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती (मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे मार्फत)
२२.सचिव (ग्रामविकास) यांचे स्वीय सहायक.
२३. माहिती तंत्रज्ञान कक्ष, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई
२४.निवडनस्ती, कार्यासन पंरा-४.



Scanned by CamScanner